## विरक्त

मी प्रत्येकात असतो, कधी शुभ्र कधी रंगातला ।
कधी वाटतो तीक्ष्ण, कधी कळेना विरघळतो कसा ॥

मध्येच हरवूनी आकाशी, शिवूनी येतो क्षितिजाला ।
कधी सोडीना स्थान, बेडीत अडकुनी पडे जसा ॥

रंग लेऊनही इंद्रधनुचे, ना वेष कोण्या रंगातला ।
अथांग असूनही इवला कोमल, मी असतो त्या दवबिंदूतला ॥


**सचिन पु. कुलकर्णी**
www.saarthbodh.com